## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क. १३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०२/२०१७

**१) टेंम्पो चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :–**

दिनांक २२/०२/२०१७ चे १७.३० ते १८.०० वा. दरम्यान यातील यामा कंपनी मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी ४५१७ चा चालक प्रेमानंद देवराम तांडेकर वय २६ वर्ष, रा. उसगाव हा लाखनी येथुन उसगाव येथे जात असतांना यातील अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील टेंम्पो हयगयीने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक देवुन चालकास गंभिर जखमी करुन पडुन गेल्याने फिर्यादी राकेश शामराव भोसकर वय २४ वर्ष, रा. परसोडी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवी. सहकलम १३०(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. थेर पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**२) जमीनीचे पैसे घेवुन सुध्दा खोदकाम थांबवुन हातात फावडा घेवुन मारण्यास धावला व पोकलॅन्ड मशीन जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २२/०२/२०१७ चे १५.१५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी किशोर देवीलाल दमाहे वय ४९ वर्ष, सहाय्यक अभियंता टेकेपार.यांचे देखरेखे खाली टेकेपार उपसा सिंचन विना रोखेचे पोकलॅन्ड मशीन व्दारे खोद काम करीत असतांना यातील आरोपीने जमीनीचे पैसे घेवुन सुध्दा हातात फावडा घेवुन फिर्यादीस मारण्यास धावला व खोदकाम थांबवुन सरकारी कामात अडथळा निर्माण करुन पोकलॅन्ड मशीनवर पेट्रोल टाकुन जाळुन नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३५३,३४१,४३५,४२७,१८६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) शेतावरील मोटार पंपाचे सामानाची चोरी . :–**

दिनांक २१/०२/२०१७ चे १९.०० ते २२/०२/०१७ चे ०५.०० वा. पुर्वी रा. दरम्यान. यातील फिर्यादी आंनदराव लक्ष्मण दुनेदार वय ५५ वर्ष, रा. कन्हाळगाव यांचे बाजुचे मनोज खंडाईत रा. लाखांदुर याचे शेतावरील लावलेल्या मोटार पंपाचे सामान आटोडाम कंपनीचे ४ आटो स्विचं, अशोका कंपनीची मेन स्विच १ नग, निळया रंगाचा केबल वायर ४०० फुट असा एकुण ४५,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. घागी पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २२/०२/२०१७ चे १५.३० वा. पुर्वी रा. दरम्यान. यातील फिर्यादी सतीश विठ्ठल सुर्यवंशी रा. खमारी बुटी यांचे हिरो होन्डा कंपनीची सिडी डिस्कव्हर मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे. २७९२ किंमती २०,०००/–रु. ची त्याचा मित्र धरम भागवान रहागडाले रा. खमारी बुटी याने भंडारा येथे कपडे खरेदी करीता घेवुन आला व घटनास्थळी मोटार सायकल उभी करुन हॅन्डल लॉक न करता कपडे खरेदी करण्याकरीता दुकानात गेला कपडे खरेदी करुन मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी पाहीले असता मोटार सायकल दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने सुना मौका चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २२/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ४३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ३५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

सपोनि.टी.एस.कोंयडे
नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९७७३२८२१००

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.